कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)

Konkan Housing And Area Development Board

म्हाडा MHADA

उप मुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय

कक्ष क्र. 255 (पणन) पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई -400051

दूरध्वनी : 022- 66405027, 5054, 5064, 5026, 5044, 5045, 5099

दिनांकः -04/09/2026

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यांतर्गत देकार पत्र
(First Come First Serve Basis Offer Letter)

प्रति,

श्री/श्रीमती .:-MANSI VIJAY PAWAR

अर्जदाराचा पत्ता :- D/O VIJAY PAWAR ROOM NO.108/R-3,SAI DEEP C.H.S.,RAM MANDIR ROAD NEAR SOMANI GRAM GOREGAON WEST MUMBAI MAHARASHTRA 400104

विषय : संकेत क्रमांक-274A योजनेतील एक गठ्ठा 100 पेक्षा जास्त व्रिक्री अंतर्गत NEW SATARA Z.N. MULTISTATE MULTIPURPOSE CO-OP. SOCIETY LTD. यांचे व्दारा आपणांस करिता आरक्षित सदनिका वितरणाचे तात्पुरते देकार

संदर्भः 1) आपला अर्ज क्र.9750018417 प्रवर्ग .SC

2) NEW SATARA Z.N. MULTISTATE MULTIPURPOSE CO-OP. SOCIETY LTD. यांचे सोबत दि. 29-11-2024 रोजीचा करारनामा (NEW SATARA Z.N. MULTISTATE MULTIPURPOSE CO-OP. SOCIETY LTD.यांचे व्दारा)

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भ नुसार NEW SATARA Z.N. MULTISTATE MULTIPURPOSE CO-OP. SOCIETY LTD. आपण कोंकण मंडळ विक्री ऑनलाइन पद्धतीने सादर केलेली कागदपत्रे व प्रमाणपत्रांनुसार आपणांस सदर सदनिका संगणकीय कार्यप्रणालीव्दारे आरक्षित ठेवण्यात

2) आपणांस सदरहू योजेनेतील संकेत क्र. 274A अंतर्गत असलेल्या इमारत/सदनिका क्रमांक 11-F-21-2108 चे वितरणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तात्पुरते देकार पत्र(Provisional Offer Letter) देण्यात येत आहे. या पत्रातील पुढील अटी - शर्तीची पूर्तता करून गाळयाच्या किंमतीचा भरणा केल्यास अंतिम वितरणपत्र देण्यात येईल.

3) आपणांस देण्यात येणा-या सदनिकेचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

3.1)इमारत/ सदनिकाचा क्रमांकः-11-F-21-2108

3.2)योजेनेचे नाव व ठिकाण :-Virar-Bolinj-8 संकेत क्र.-274A

3.3) सदनिकाचे चटई क्षेत्रफळ चौ. मी. 40.94 Sq.Mt. आहे.

3.4)सदनिकाची अंदाजित किंमत रु. 2299623.92/- (12% सवलत वजा करून)

3.5)सदनिकांची किंमत व इतर रकमेचा ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा.

Signature valid
Rupal Santosh Ghag
04.09.2026 15:05

4) सदनिकेची किंमत भरण्याचा कालावधी/ पद्धत : -

सदनिकेची किंमत भरण्यासाठी आपण खालील अट क्र. 4.1. अथवा 4.2. प्रमाणे पर्यायांचा अवलंब करू शकता.

4.1) आपल्याला सदनिकेची किंमत अदा करण्यासाठी / भरण्यासाठी खालील परिपत्रकात नमुद केलेल्या वेळापत्रकानुसा (दोन -टप्प्यात) गाळ्याची विक्री किंमत भरावयाची आहे.

टप्पा	सदनिकेची रक्कम	मुदत
1	सदनिकेच्या किंमतीच्या 10% रक्कम	सदनिका आरक्षित करताना भरणा केली आहे.
2	उर्वरित 90% रक्कम	देकरपत्राच्या दिनांकापासून पुढील 90 दिवसात रक्कम भरणे बंधनकारक आहे.

टप्पा-1] गाळयाच्या एकूण रुपये 2299623.92/- किंमतीच्या रक्कमेपैकी 10% रक्कम म्हणजेच रुपये 229962.39/- सदनिका आरक्षित करताना भरणा केली आहे.

टप्पा-2] गाळयाच्या किंमतीपोटी पुढील 90% रक्कम म्हणजेच रुपये 2069661.53/- या पत्राच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत भरण्यात यावी. सदर कालावधीत भरणा न केल्यास अधिकतम 90 दिवसांची मुदतवाढ घेऊन नियमानुसार व्याज आकारणीसह रक्कम भरणे बंधनकारक आहे. यामध्ये कसूर केल्यास गाळयाचे वितरण, कोणतेही कारण न देता, 180 दिवसांची मुदत संपताच रदद करण्यात येईल.

4.2) (विक्री अभावी रिक्त सदनिका 100 पेक्षा जास्त, एक गठ्ठा पध्दतीन NEW SATARA Z.N. MULTISTATE MULTIPURPOSE CO-OP. SOCIETY LTD. यांचेशी संयुक्त करारनामा आहे.) जर अर्जदारांना 100 टक्के रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रक्कमी) भरावयाची आहे, असे अर्जदार बँकेमध्ये एक रक्कमी म्हणजेच 100 टक्के भरू शकतात.

4.3) आपल्या सदनिकेची किंमत रुपये पन्नास लाखापेक्षा अधिक असल्यास आपणास नियमानुसार 1% रक्कम TDS स्वरूपात आयकर विभाग भारत सरकार यांना भरणा करणे. TDS भरणा करून FORM 16B व FORM 26QB यांच्या प्रत्येकी 02 प्रति सादर कराव्यात.

Konkan Housing Board & Area Development Board
PAN NO. AAAJM0344H
TAN NO. MUMM26139B

5) सदनिकेच्या किंमती व्यतिरिक्त पुढील रक्कम अदा करावी लागेल.

5.1) नियमानुसार सदर सदनिकेच्या किंमतीपोटी भराव्या लागणाऱ्या रक्कमेवर प्रचलित स्टॅम्प ड्यूटि ॲक्टच्या नियमानुसार महाराष्ट्र शासनाचे योग्य ते मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क संबंधित खात्याकडे भरावी लागेल.

5.2.) गाळयाचे 12 महिन्याचे आगाऊ सेवाशुल्क एकत्रीतरीत्या मंडळाच्या संबंधित मिळकत व्यवस्थापन विभागाकडे गाळयाचा ताबा घेण्यापूर्वी आगाऊ भरणे आपणांस बंधनकारक राहील.

6) सदनिकेची किंमत भरण्यासाठी आपणांस वित्तीय संस्थेकडून / बँकेकडून कर्ज घेण्याचा इरादा असल्यास त्याबाबत संबंधित मिळकत व्यवस्थापक / कों. म. यांना बँकेच्या पत्रासह लेखी अर्जाद्वारे कळवावे. सदनिकाच्या एकूण किंमतीच्या रक्कमेपैकी 229962.39 रक्कम मंडळाकडे भरल्यास इतर अटींच्या अधिन राहून आपणास हव्या त्या बँकेच्या कर्ज मंजुरीचे पत्राच्या अनुषंगाने कर्ज घेण्यासाठी ''नाहरकत प्रमाणपत्र'' देण्यात येईल. कर्ज मंजूर झाल्यानंतर आपणास अदा केलेल्या व मंडळाकडे जमा केलेल्या रक्कमेचे बँकेकडून Disbursement पत्र सादर करणे अनिवार्य राहील, त्यामध्ये उशीर झाल्यास व आपणांस कर्ज प्राप्त करून घेवून ते विहित मुदतीत वाढीव 90 दिवसांच्या कालावधीत म्हाडा/ कोंकण मंडळाकडे भरणा करणे/ अदा करणे, शक्य न झाल्यास किंवा विलंब झाल्यास KHADB(MHADA) त्यास जबाबदार राहणार नाही व आपले सदनिकाचे वितरण रद्द केले जाईल.

7) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विनियम ऱ1981 मधील विनियम-25 नुसार वितरणापासून सदनिकेची 5 वर्षाच्या कालावधीपर्यंत विक्री/व्यवहार करता येणार नाही. सदनिकेची अनधिकृत विक्री ,हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास आपल्या विरुद्ध म्हाडा कलम-66 नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

8) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण -1494/(9451)/स्वेनि-1 दि. 18/07/1996 च्या आदेशानुसार सदनिका पती/ पत्नीच्या संयुक्त नावे वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

9) सदनिकेचा ताबा घेताना आवश्यक त्रुटी/दुरुस्ती बाबत समन्वय अधिका-यांकडे लेखी स्वरुपात सादर कराव्यात व सदनिका ताब्यात घेतल्यानंतर गाळयाची कसल्याही प्रकारची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी मंडळावर राहणार नाही.

10) सदनिका वाटप झाल्यानंतर सदनिकाधारकांनी तीन महिन्याच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून सहकारी संस्था अधिनियम-1960 अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करावी लागेल. सदनिकेच्या पाणीपुरवठा, जलनिस्सारण व विद्युत पुरवठा इत्यादी सुविधांची देखभाल व दुरुस्ती ही कामे सहकारी संस्थेकडे घ्यावी लागेल. तसेच म्हाडा मिळकत व्यवस्थापन विनियम -1981 मधील विनियम-21 नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीचे अभिहस्तांतरण करून घेणे आवश्यक राहील.

11) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमाती इ. प्रवर्गासाठी वितरण पत्र देण्यापूर्वी जातवैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करणे अनिवार्य आहे. तसेच सदर जातवैधता प्रमाणपत्राची सत्यता संबंधित विभागाकडून पडताळणी केल्याशिवाय अर्जदाराला सदनिकेचा ताबा दिला जाणार नाही.

12) आपण सादर केलेल्या कागदपत्रामधील भविष्यात कोणतेही कागदपत्रे खोटी/ बनावट आढळून आल्यास वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच वितरणानंतरही कोणत्याही टप्प्यावर सदनिकेचे वितरण म्हाडा अधिनियम, 1976 मधील तरतुदीनुसार वितरणपत्र रद्द करण्यात येईल.

Signature valid
Rupal Santosh

13) सदनिकेच्या वितरणाबाबत शासनाचे व प्राधिकरणाचे वितरणासंबधी सर्व कायदे, नियम, अटी-शर्ती तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा/ बदल लागू राहतील.

14) सदर देकारपत्रातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून सदनिकेच्या किंमतीचा भरणा विहित मुदतीत केल्यास सदर सदनिकेचे वितरणपत्र देण्यात येईल. मात्र देकारपत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न झाल्यास देकारपत्रातील नमूद केल्याप्रमाणे सदरचे तात्पुरते देकारपत्र रद्द करण्याची कार्यवाही संदर्भ क्र 2.चे करारनाम्या नुसार कार्यवाही करणेत येईल.

15) कोंकण मंडळाने / म्हाडाने सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी इतर कोणी व्यक्ती परस्पर म्हाडाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी आढळल्यास म्हाडाच्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी प्रा. व मिळकत व्यवस्थापक / कोंकण मंडळ. यांचेशी संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

मिळकत व्यवस्थापक/पणन

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ म्हाडा, मुंबई

Signature valid

Rupal Santosh Ghag

04.09.2026 15:05